


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : २१५ वा शनिवार दि १८ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# अव्वल कारकून हटकरांचा हटखोरपणा जाईना!

## शासकीय कामकाजाच्या वेळात महसूल संघटनेची नियमबाह्य सभा!

**जनसंचलन/सिंदखेड राजा**

किशोर हटकर सामान्य व्यवस्थापन अव्वल कारकून यांनी शासकीय कामकाजाच्या वेळेत महसूल कर्मचारी संघटनेची नियमबाह्य सभा घेतल्याचा प्रकार समोर आला आहे. सिंदखेडराजा येथील कार्यालयात १९ सप्टेंबर रोजी ही सभा घेण्यात आली आहे.याकडे वरिष्ठांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे. किशोर हटकर सामान्य व्यवस्थापन अव्वल कारकून यांनी शासकीय कामकाजाच्या वेळेत नियमबाह्य सभा घेऊन महसूल कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी नियुक्त केले आहे.यासंदर्भातील सोशल मिडीयावर व वृत्तपत्रात बातम्या व्हायरल झाल्यात.याबाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिक्षक यांना हटकर व इतर दोन कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती बद्दल विचारणा केली असता माहिती देण्यात आली नाही. हटकर यांनी तलाठी



आस्थापना विभागाचे कर्मचारी डीए शेळके यांच्या विषयी तक्रारकर्त्यांनी केलेल्या तक्रारी बाबत कार्यवाही केली नाही तसेच मे २०२५ च्या शासनाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रतिनियुक्तीवर कर्मचाऱ्यांची प्रशासकीय बदल्या केल्या होत्या ते कर्मचारी दिलेल्या ठिकाणी अद्याप ही रुजू झाले नाहीत. त्यामुळे मनमानीपणा ठळकपणे जाणवत असून, वरिष्ठांनी याकडे लक्ष पुरविणे गरजेचे झाले आहे





# खंडणीखोर पत्रकारांना पाठबळ कोणाचे?

## पत्रकारितेतील झूल पांघरून दिवसा ढवळ्या दरोडेखोरी करणाऱ्या बांडगुळांवर अंकुश लावण्याची गरज!

**जनसंचलन/बुलढाणा**

अवैध धंदे, गुन्हेगारी वृत्ती, भ्रष्ट व्यवस्था यांच्याविरुद्ध लढणारा लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणजे पत्रकार असतोय.. आज तोच हरवला आहे. ही त्याची झाली एक बाजू... काही चांगलेही पत्रकार आहेत, ते त्यांचं कर्तव्य अगदी तंतोतंत,निःस्वार्थ, वंचितांना न्याय देण्यासाठी, जीवाची पर्वा न करता करत असतात. त्याचं पाऊल जनतेच्या हितासाठीच असते..असे पत्रकार वगळता काही लोचट प्रवृत्तीचे लोक त्यामध्ये मिसळले आहेत. या तोतयांनी हल्ली तर सोशल मीडियाच्या यू टयूब चैनल आधारे पत्रकार असल्याचेअखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाने तक्रार दिली आहे. बुलढाणा जिल्ह्यात बनावट पत्रक सादर केले जात असल्याने वास्तविक पत्रकारिता करणाऱ्यांना याचा त्रास होत आहे.जिल्ह्यातील बुलडाणा, खामगाव, मलकापूर, शेगाव , नांदुरा, जळगाव जामोद तालुक्यात बनावट सार्धम्य असलेली वृत्तपत्र डिजिटल माध्यमांवर आढळून आली. लोकतंत्र असे त्याचे नाव आहे. शासनाची याला कुठलीच परवानगी नसतांना ते वाहनांवर देखील प्रेस लिहून भरधाव वाहन दमटतात.या शिवाय जिल्ह्यात इतरही तोतया पत्रकार दिवाळी जाहिरातीसाठी अनेक कार्यालयात फिरताना दिसून येतात.भासवित गंडविण्याचा प्रकार सुरु केला आहे. त्यामुळे पत्रकार सुरक्षा कायद्यानुसार कारवाई करण्यात येण्याची मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष राजू घाटे पाटील यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.शहरात, गावांत,आणि मनामनांत गस्त घालणारे दैनिक शिक्षण असणाऱ्यांना पत्रकरितेची झूल पांघरून उजळमाध्याने एखाद्याला निशाणा करून राजरोसपणे दरोडेखोरी चालवली असून काही ठिकाणी यांच्या टोळयाच निर्माण झालेल्या आहेत दिवसागणिक वेगवेगळ्या नावाने अनेके चॅनेल्स येत आह



काहींनी तर वेबपोर्टल काही हजारांत तयार करुन देण्याचा धंदा मांडला असून या दरोडेखोरांना कायदेशीर स्वरुप देत आहेत. पत्रकारितेत परंपरेने घालून दिलेली काही तत्त्वं आहेत, या तत्त्वांच्या चौकटीमध्ये काम करणं ही खरंच तारेवरची कसरत आहे,ऐवढेसुर्यसत्य!

# शांतिदूत ठरले वादाचे मूळ...

## संपादकीय लेख



कबुतरे, विशेषतः पांढरी कबुतरे ही नेहमी शांतिदूताचे प्रतीक म्हणून दाखवली गेली. त्याचप्रमाणे प्रेमिकांना एकमेकांचे संदेश पोहोचविण्याची नाजुक जबाबदारीही त्यांच्यावर दिली गेली. हे सर्व साहित्य आणि चित्रपटांपुरते ठीक होते. मात्र प्रत्यक्ष जगात प्रेमाऐवजी जंतू वाहून नेण्याची सवय आणि बेसुमार संख्या यामुळे ती रोगवाहकच ठरू लागली. मुंबईसारख्या शहरांमधील वर्षानुवर्षांचे कबुतरखाने रोगराईचे उगमस्थान ठरण्याचा धोका निर्माण झाला. इमारतींचे सज्जे, गच्च्या, रहिवाशांच्या घरांच्या खिडक्या-तावदाने, वातानुकूलन यंत्रांमधल्या मोकळ्या जागा, पत्रे यावरही कबुतरे बिऱ्हाडे थाटू लागली. कबुतरांची विष्ठा, त्यांचे त्रासदायक गुटरगू आणि पिसांमधून वाहून येणारे जंतू हे सर्व तापदायक ठरू लागले. श्वसनमार्गे फुफ्फुसाचा होणारा त्रास, पोटदुखी, पुरळ येणे, अतिसार, खोकला, दम लागणे अशा प्रकारच्या आरोग्याच्या तक्रारी लोकांकडून येऊ लागल्या. या सर्व पार्श्वभूमीवर मुंबईत कबुतरांना धान्याचे दाणे टाकण्याला मज्जाव करण्याची नितांत गरज होती. मात्र, आजकाल कोणताही प्रश्न राजकीय वादाची फोडणी मिळाल्याखेरीज सुटत नाही. या प्रश्नासही इतके राजकीय रंग प्राप्त होतील, असे कुणाला वाटले नसेल. विधिमंडळाच्या सभागृहात मंत्री व शिवसेना नेते उदय सामंत यांनी मुंबईतील ५० कबुतरखाने बंद करण्याची घोषणा केली. न्यायालयानेही कबुतरांना खाद्य देणाऱ्यांना महापालिका नियमानुसार दंड ठोठावण्याचे निर्देश दिले. त्यानुसार मुंबई महापालिकेने कारवाई सुरू केली. मात्र, आजकाल सरकारचा एकही निर्णय फेरविचार, समित्या याशिवाय पुढे जात नाही, तसेच याही बाबतीत झाले. या सर्वांवर कडी म्हणजे जैन समाजातील महिलांनी आक्रमक होत दादरच्या झाकलेल्या कबुतरखान्याचे आवरण हत्यारांनी टराटरा फाडले. त्यामुळे हा प्रश्न केवळ आरोग्यापुरता न उरता कायदा-सुव्यवस्था, सामाजिक तेढ, भाजप व शिवसेना, मुख्यमंत्री, मंगलप्रभात लोढा व शिवसैनिक अशा विविध पातळ्यांवर जाऊन पोहोचला. तूर्तास तरी मुंबई उच्च न्यायालयाने कबुतरांना खाद्य देण्यास बंदीच्या बाजूने कौल दिला असून तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने उग्र बनलेल्या या प्रश्नाची पिसे आता खूप निघाली. त्यावर काहीतरी सखोल उपाय करावाच लागेल. जीवशास्त्रज्ञ, वैद्यकतज्ज्ञ, पक्षीतज्ज्ञ यांची मदत घेऊन कबुतरांच्या संख्येला पायबंद आणि त्यांचा त्रास रोखण्यावरचे उपाय शोधून काढण्यास प्राधान्य द्यावे लागेल.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राधाकृष्ण विखे पाटील यांना सोडणार नाही

## भुजबळ यांचा ओबीसींच्या एल्गार मेळाव्यात इशारा




**बीड :** बीडमध्ये ओबीसींचा महाएल्गार मेळावा पार पडला. या मेळाव्यात मंत्री छगन भुजबळ यांनी अत्यंत आक्रमक भाषण केलं. मराठा मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील हे मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीगाठी घेताना याआधी दिसले आहेत. यावरुन छगन भुजबळ यांनी भाजपला मोठा इशारा दिला. राधाकृष्ण विखे पाटील यांनाही सोडणार नाही, असं छगन भुजबळ म्हणाले. भुजबळांनी यावेळी मनोज जरांगे पाटील यांच्यावरही टीका केली. तसेच भाजपने आपल्या नेत्यांना आवरावं, असं आवाहन छगन भुजबळ यांनी केलं. जरांगे म्हणतात, ओबीसींना पाडा, असे आदेश आम्हीही देऊ शकतो, असादेखील इशारा भुजबळ यांनी दिला.'२ सप्टेंबरला एक जीआर निघाला. आम्ही कोर्टाला गेलो. आमचे मोठे वकील उभे आहेत. माझी खात्री आहे, आम्हाला न्याय मिळाल्याशिवाय राहणार नाही. पण आम्ही दुहेरी लढणार आहोत. एक लढाई न्यायदेवतेकडे लढणार आहोत. दुसरी लढाई म्हणजे रस्ता तर आमच्याच बापाचा आहे हे लक्षात ठेवा. काय तुम्ही सांगता. मला सांगता तुम्ही येऊ नका. तो विखे कसाकाय आला? विखे आला आणि संपूर्ण महाराष्ट्रात विखार पसरवून गेला', असा घणाघात छगन भुजबळ यांनी केला.माझ्याकडे जातीचं प्रमाणपत्र आहे. ३ ऑक्टोबर २०२५ ला सकाळी अर्ज केला. त्याच दिवशी संध्याकाळी जात प्रमाणपत्र मिळालं. अरे आठ-आठ, दहा-दहा महिने लागतात. तुमचे अधिकारी एवढे फास्ट कसे झाले? अनेक सर्टिफिकेट चेक झाले? मी मुख्यमंत्र्यांना सांगितलं. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सांगितलं. एवढे फास्ट अधिकारी या देशात कधीपासून जन्माला आले? आम्हाला १० महिने लागतात, ह्यांना १० तासांत. आपणच सांगितलं की, ओबीसी आमचा डीएनए आहे. हा डिएनए कधी सरकेल सांगता येणार नाही', असा इशारा भुजबळांनी दिला. विखेंनी जरांगेंच्या हातात एक जीआर दिला. दरिंदे पाटलाने सांगितलं की, विखे हा पात्र शब्द काढून या. एक तासाच पात्र शब्द काढला. हा कुठला कायदा आहे? माझ्याकडे सर्व पुरावे आहेत. म राठा आणि कुणबी वेगळ्या जाती आहेत. हायकोर्टाचे निकाल आहेत. अरे कसंकाय तुम्ही ओबीसीतून आरक्षण देता? सुप्रीम कोर्टाने सुद्धा सांगितलं की, मराठा समाज सामाजिकदृष्ट्या मागास नाहीत. त्यावेळी सीएम नागपूरला होते. त्यांनी निर्णय घेऊन टाकला. पात्र शब्द काढून टाकला. मला मुख्यमंत्र्यांना सांगायचं आहे, ही मंडळी तुमच्या वाईटावर आलेली आहे. तुम्हाला अडचणी निर्माण करणार आहेत. त्यांचा टार्गेट देवेंद्र फडणवीस आहे हे लक्षात ठेवा', असा दावा भुजबळांनी केला. आता निवडणुका येत आहेत. एका विरुद्ध एक लढा. विजय तुमचाच आहे. दलित, आदिवासी, मुस्लिम सर्वांना एकत्र घ्या. विजय तुमचाच आहे. तुम्ही अशा रितीने लोकांना मार्गदर्शन करत असाल तर आम्हाला सुद्धा करता येतं. विरोधी पक्षाच्या एका मोठ्या नेत्याने मला फोन केला की, आम्ही जरांगेंना भेटायला गेलो तर आमच्यावर टीका करता, पण तुमचे हे विखे पाटील कारण नसताना परत परत जातात त्यांना का बोलत नाहीत? आम्ही त्यांना सुद्धा सोडणार नाहीत. गप्प बसणार नाहीत. भाजपच्या नेत्यांनाही सांगतोय तुमच्या लोकांना आवरा. तुम्ही आता केलंय तर आम्ही कोर्टात लढू. निवडणुकीत लढू', असादेखील इशारा त्यांनी दिला.

## नाईक आणि चव्हाण यांच्यात खल, भाजपचं काय ठरतंय?



**ठाणे :** ठाणे शहरात सध्या मोठ्या घडामोडी घडताना बघायला मिळत आहेत. ठाणे महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महायुतीचे घटक पक्ष भाजप आणि शिवसेना आगामी पालिका निवडणुका स्वतंत्र लढण्याच्या तयारीत आहेत, अशी चर्चा आहे. तशा घडामोडी देखील बघायला मिळत आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढण्याची घोषणा याआधीच केली होती. पण ठाण्यात वेगळ्या घडामोडी घडताना बघायला मिळत आहेत. ठाणे शहर एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला मानला जातो. इथे शिवसेनेची सत्ता आहे. ठाणे महापालिकेत २०१७ च्या निवडणुकीत शिवसेनेचा विजय झाला होता. तर भाजपला केवळ २३ जागा जिंकून आणता आलं होतं. पण यावेळी भाजपच्या पदाधिकाऱ्यांचा एकला चलोचा नारा आहे. ठाण्यात स्वतंत्र निवडणुका लढवून १३१ पैकी ७० जागांवर निवडून येण्याचा निर्धार भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.ठाण्यात मंत्री गणेश नाईक यांनी विशेष लक्ष घातलं आहे. गणेश नाईक यांच्याकडून ठाण्यात जनता दरबार भरवला जातो. तसेच ठाणे भाजपमय व्हावं यासाठी गणेश नाईक यांच्याकडून प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे शिंदेंच्या शिवसेनेतही नाराजी असल्याची चर्चा सातत्याने समोर येत असते. दरम्यान, गणेश नाईक यांच्याकडून आगामी निवडणुकांसाठी ठाण्यात रणनीती आखली जात आहे.

## दीपोत्सव कार्यक्रमात ठाकरे कुटुंबाने दाखवली एकी



**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणातील आज मोठा दिवस मानला जात होता. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची गेल्या काही दिवसांपासूनची आज सातवी भेट घडून आली. मनसेकडून दादरच्या शिवाजी पार्क मैदानात आयोजित करण्यात आलेल्या दीपोत्सव कार्यक्रमाचं उद्घाटन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते पार पडलं. उद्धव ठाकरे आज कुटुंबासह संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ बंगल्यावर दाखल झाले होते. उद्धव ठाकरे यांच्यासोबत पत्नी रश्मी ठाकरे, मुलगा तेजस ठाकरे आणि आमदार आदित्य ठाकरे हे देखील शिवतीर्थ बंगल्यावर दाखल झाले. उद्धव ठाकरे केवळ दोन-तीन वाक्य बोलून मंचावरुन माघारी परतले. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. दिवाळी असल्या कारणास्तव ठाकरे बंधूंनी या कार्यक्रमात राजकीय भाष्य करणं टाळलेलं बघायला मिळालं. तर राज ठाकरे यांनी आपलं मनोगत यावेळी व्यक्त केलं नाही.उपस्थित सर्व बांधवांनो, भगिणींनो आणि मातांनो, दिवाळीच्या सर्वांना शुभेच्छा! आजची दिवाळी ही वेगळी आहे आणि विशेष आहे. मला खात्री आहे की, मराठी मणसाची एकजूट आणि त्या एकजुटीचा प्रकाश सर्वांच्या आयुष्यात आनंद घेऊन आल्याशिवाय राहणार नाही. असेच सर्वजण आनंदात, प्रकाशात राहा. सर्वांना आनंद देत राहा. परत एकदा शुभेच्छा देतो. जय हिंद. जय महाराष्ट्र', असं उद्धव ठाकरे दीपोत्सवाच्या उद्घाटनावेळी म्हणाले.ठाकरे कुटुंबिय एकत्र येत असताना दोन्ही बांधव काय बोलतात? तेच महत्त्वाची नाही तर त्यांची देहबोली कशी होती, याकडे देखील सर्वांचं लक्ष होतं. या कार्यक्रमासाठी ठाकरे कुटुंबिय चारचाकी गाड्यांमधून शिवाजी पार्कच्या दिशेला निघाले होते. यावेळी ठाकरे बंधू एकाच गाडीत होते. या गाडीचं स्टीअरिंग राज ठाकरे यांच्या हाती होतं. तर दुसऱ्या घाडीत आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे होते. आदित्य ठाकरे ही गाडी चालवत होते. तर तिसऱ्या गाडीत राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे होते. ठाकरे कुटुंबिय या कार्यक्रमात अत्यंत आनंदात एकत्र आलेले बघायला मिळाले.

# गोकुळवरचा मोर्चा आमच्या काळजावरची ठेच

## मुश्रीफ-पाटील यांचा थेट महाडिक गटावर हल्ला



**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळ दूध संघाच्या वसुबारस निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांनी थेट प्रशासकीय आणि राजकीय विरोधकांवर आवाज उठवत तीव्र टीका केली. गोकुळवर गाई-म्हशींसह काढण्यात आलेल्या मोर्चा हा आमच्या काळजावरची ठेच असल्याचं त्यांनी बोलून दाखवलं आहे. तर मंत्री मुश्रीफ यांच्यासोबतच आमदार सतेज पाटील यांनी देखील डिबेंचरच्या वादात महाडिक गटाला लक्ष्य केलं. गेल्या साडेचार वर्षात गोकुळमध्ये आम्ही कुणाचा जावई मोठा व्हावा म्हणून आम्ही प्रयत्न केले नसून दूध उत्पादकांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत, असा टोला आमदार सतेज पाटील यांनी लगावला.

या कार्यक्रमावेळी बोलताना वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली. 'ज्यांनी ३२ वर्षे गोकुळवर सत्ता सांभाळली, त्यांच्याच सूनबाईंनी विरोधी मोर्चाचे नेतृत्व करणे योग्य नाही. सत्तेत असताना जे डिबेंचर सुरु केले, त्याच्याच विरोधात उभे राहणे मूर्खपणाचे आहे. कालचा मोर्चा आमच्या काळजाला ठेच देणारा होता', असं ते म्हणाले. मुश्रीफ यांनी डिबेंचरचा मुद्दा नीट अभ्यासून आणि शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करूनच पुढील निर्णय घेतले जाणार असल्याची खात्री दिली. 'गोकुळचे दूध संकलन २५ लाख लिटरांवर नेण्याचा उद्देश असून शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आम्ही सतत प्रयत्न करत आहोत', असंही मुश्रीफ यावेळी म्हणाले.या कार्यक्रमात काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनीही महाडिक गटावर हल्लाबोल केला. 'गोकुळमध्ये गेली साडेचार वर्ष दूध उत्पादकांसाठी हितकारक निर्णय घेतले गेले आहेत. कुणाचा जावई मोठा व्हावा, यासाठी आम्ही काहीही केलं नाही. संचालक मंडळात ज्यांनी डिबेंचरवर सह्या केल्या, त्यांची नावे जाहीर केली पाहिजेत. बाहेर एक आणि आत एक, अशा धोरणामुळे शेतकऱ्यांचा भलं होत नाही', असं म्हणत पाटील यांनी महाडिक गटाच्या दोन रूपांची भूमिका लक्षात आणून दिली.मुश्रीफ यांनी गोकुळ दूध संघानं गायी आणि म्हशीच्या दुधाच्या दरात प्रत्येकी एक रुपयांची वाढ केली असल्याची घोषणा केली. ही वाढ १ ऑक्टोबरपासूनच लागू आहे. त्यांनी सत्तेत येताच शेतकऱ्यांना एकूण १५ रुपये दूधदर वाढीला मदत केली. तसेच पशुखाद्याच्या किंमतीत ५० रुपये कपात केली असल्याची माहिती दिली.गोकुळतर्फे मुख्य कार्यक्रम हा वसुबारसनिमित्त गोकुळच्या नव्या उत्पादनांच्या विक्री शुभारंभाचा होता. या कार्यक्रमात गोकुळच्या गायी-म्हशी पूजनाबरोबर गुलाबजाम, चीज आणि पशुखाद्य अशा नव्या दुग्धोत्पादनांचा शुभारंभ झाला. संघाच्या राजकीय वादांमध्ये डिबेंचरचा मुद्दा साईडलाईन झाला असला तरी दुग्धोत्पादन आणि विक्रीत प्रगतीसाठी गोकुळने महत्त्वपूर्ण पावलं उचलली आहेत.

# बनावट नोटा प्रकरणातील गूढ वाढलं! भूषण पतंगेचा मृत्यू व्हेंटिलेटरवर की पोलिसी डाव?

**रायगड :** बनावट नोटा प्रकरणातील आरोपी भूषण पतंगे याच्या मृत्यूभोवतीचं गूढ दिवसेंदिवस अधिकच गडद होत चाललं आहे. मृत्यूनंतर तब्बल १७ तास उलटून गेले, तरीही शवविच्छेदन न झाल्यानं प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त होत आहे. सायंकाळी साधारण सहा ते साडेसहा वाजण्याच्या सुमारास अलिबाग न्यायालयाचे पथक जे.जे. रुग्णालयाकडे रवाना झाल्याची माहिती मिळाली असून, शवविच्छेदन मुंबईतच होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.

भूषण पतंगे हा अलिबाग पोलिसांच्या ताब्यात असताना गंभीर आजारी पडला आणि त्याला तात्काळ रुग्णालयात हलवण्यात आलं. मात्र नेमकं काय झालं, हे अजूनही स्पष्ट झालेलं नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,



तो उपचारादरम्यान मरण पावला, पण नातेवाईक मात्र 'तो पोलिस चौकशीत मारला गेला', असा गंभीर आरोप करत आहेत.मृत्यू नोंदवून १७ तास उलटून गेल्यानंतरही शवविच्छेदन न झाल्यानं कुटुंबियांचा संताप वाढला आहे. ते म्हणतात, 'जर मृत्यू नैसर्गिक असेल तर शवविच्छेदन लपवण्याचं कारण काय?' त्यांनी शवविच्छेदन व्हिडिओग्राफी आणि न्यायालयाच्या उपस्थितीत पारदर्शकपणे करण्याची मागणी केली आहे.स्थानिक पोलिस याबाबत कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर करत नाहीत. दरम्यान, अलिबाग परिसरात या घटनेनं तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. काही समाजसेवी संघटनांनीही या घटनेचा निषेध करत स्वतंत्र तपासाची मागणी केली आहे. 'आरोपी पोलिस ताब्यात असताना मरण पावला, म्हणजे जबाबदारी कोणाची?' हा प्रश्न आता सरळ प्रशासनाकडेच झेपावतो आहे.

**१७ तासानंतरही पोस्टमार्टम नाही**

## राजकीय हस्तक्षेपाची चर्चा

या प्रकरणावर आता राजकीय सावलीही दिसू लागली आहे. काही स्थानिक नेते यांनी जिल्हा प्रशासन आणि पोलिस विभागावर 'आरोपीचा मृत्यू झाकण्याचा प्रयत्न' केल्याचा आरोप केला आहे. 'जर सर्व काही नियमानुसार असेल, तर शवविच्छेदन इतकं लांबवायचं का?' असा प्रश्न ते विचारत आहेत.

## जे.जे. रुग्णालयात निर्णायक टप्पा

सायंकाळी अलिबाग कोर्टाचं पथक जे.जे. रुग्णालयाकडे रवाना झालं असून, शवविच्छेदन प्रक्रिया मुंबईतच होणार आहे. या अहवालावरूनच भूषण पतंगेचा मृत्यू वैद्यकीय चूक, पोलिस अत्याचार, की इतर कारणाने झाला? हे स्पष्ट होणार आहे.

---

# खेडात दाऊद इब्राहिमच्या तीन भूखंडांचा ४ नोव्हेंबरला लिलाव

**रत्नागिरी :** अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याच्या मालमत्तांवर केंद्र सरकारने कारवाई कायम ठेवली आहे. या कारवाई नुसार रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील दाऊदच्या तीन भूखंडांचा लिलाव होणार आहे. खेड तालुक्यातील दाऊद इब्राहिम याच्या तीन भूखंडांचा लिलाव ४ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे. यासाठी आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. या लिलावात समाविष्ट असलेल्या मालमत्तांमध्ये सुमारे १७१ चौरस मीटर शेतजमिनीचा एक तुकडा आणि दोन इतर भूखंडांचा समावेश आहे. या सर्व मालमत्ता स्मगलर्स अँड फॉरेन एक्स्चेंज मॅनिप्युलेटर्स या केंद्रीय संस्थेने पूर्वीच जप्त केल्या आहेत. या संस्थेच्या मार्फतच म ालमत्तेचा लिलाव पार पडणार आहे.

जानेवारी २०२४ मध्ये दाऊद इब्राहिम याच्या खेड तालुक्यातील मुंबके गावातील चार मालमत्तांचा लिलाव करण्यात आला होता. या मालमत्ता जिथे दाऊद आणि त्याच्या भावंडांनी बालपणाचा काही काळ घालवला होता, त्या ठिकाणी आहेत. या मालमत्तांवर अनेक इच्छुकांनी बोली लावली होती, मात्र काही जमिनींच्या वादांमुळे अंतिम हस्तांतरण प्रक्रियेला उशीर झाला होता.या नव्या लिलावासाठी ऑनलाइन आणि प्रत्यक्ष बोली प्रक्रियेचे पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या मालमत्ता संपूर्णपणे कायदेशीररित्या जप्त करण्यात आल्या आहेत आणि त्यांचा कोणत्याही प्रकारे गुन्हेगारी व्यवहाराशी संबंध राहिलेला नाही, असे स्पष्टीकरण केन्द्र शासनाने यापूर्वीच केले आहे.

काही स्थानिक गुंतवणूकदार आणि उद्योगपती या जमिनींबद्दल रस दाखवत आहेत. मुंबके गावात दाऊदच्या पूर्वीच्या मालमत्तांबाबत लोकांमध्ये अजूनही चर्चे चा विषय कायम आहे. दाऊद इब्राहिम विरुद्ध केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात आणि गुजरातमध्ये अनेक म ालमत्तांची जप्ती आणि लिलाव प्रक्रिया हाती घेतली आहे.

# बिहारला जाणाऱ्या गरीबरथ एक्सप्रेसला आग, तीन डबे जळून खाक; प्रवाशांना वाचवण्यात यश

**अमृतसर :** पंजाबमधील अमृतसरहून बिहारमधील सहरसा येथे जाणाऱ्या गरीबरथ एक्सप्रेसमध्ये शनिवारी पहाटे मोठी दुर्घटना घडली. या ट्रेनचे तीन डबे जळून खाक झाले आहे. शनिवारी (१८ ऑक्टोबर) सकाळी पंजाबमधील सरहिंद रेल्वेस्थानकावरून ट्रेन सुटल्यानंतर अंबाला स्टेशनच्या एक किलोमीटर मागे असताना ही दुर्घटना घडली.

ट्रेनच्या एका डब्यातून धूर निघत असल्याचं पाहून ट्रेन थांबवण्यात आली. ही आग ट्रेनच्या तीन डब्यांमध्ये पसरली. ट्रेन थांबताच प्रवासी बाहेर धावले. या दुर्घटनेत कुठलीही जीवितहानी झालेली नाही. सर्व प्रवासी सुखरुप असल्याचं सांगण्यात आलं आहे.

सरहिंद जीआरपी एसएचओ रतन लाल यांनी या घटनेची माहिती देताना सांगितलं की ट्रेनच्या एका डब्यातून धुराचे लोळ बाहेर पडत असल्याचं पाहिलं. त्यानंतर ताबडतोब ट्रेन थांबवण्यात आली. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. ट्रेन थांबताच प्रवासी लगबगीने ट्रेनमधून उतरले. या आगीमुळे ट्रेनचे तीन डबे जळून खाक झाले आहेत. मात्र, आगीचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. आम्ही आग लागण्यामागचं कारण शोधण्याचा प्रयत्न करत आहोत. लवकरच यासंबंधीचं निवेदन जारी केलं जाईल. त्याद्वारे आगीचं कारणही स्पष्ट केलं जाईल.

या घटनेची माहिती देताना रेल्वे मंत्रालयाने म्हटलं आहे की पंजाबमधील सरहिंद स्टेशनजवळ आज सकाळी १२२०४ अमृतसह सहरसा गरीब रथ एक्सप्रेसच्या एका डब्याला आग लागली. या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आग विझवण्यात आली आहे.



## दुर्घटनेत एक महिला जखमी

गरीबरथ एक्सप्रेस पहाटे अमृतसरवरून सुटली. त्यानंतर सरहिंद रेल्वे स्टेशनजवळ धावत्या ट्रेनच्या एका एसी बोगीमध्ये आग लागली. त्यानंतर तातडीने ट्रेन थांबवण्यात आली. ट्रेन थांबताच प्रवाशांनी पटापट ट्रेनमधून उड्या मारल्या. दरम्यान ही आग पसरली आणि आणि दोन डब्यांनी पेट घेतला. काही स्थानिक प्रसारमाध्यमांनी म्हटलं आहे की या घटनेत एक महिला जखमी झाली आहे. या महिलेला जवळच्याच शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून तिच्यावर उपचार चालू आहेत.

---

# भावोजीला निर्घृणपणे संपवलं; मुलं म्हणाली- मामाने असं का केलं?

**जयपूर :** एका व्यक्तीच्या एका कृत्याने एका कुटुंबाचा आधार हिरावून घेतला. ही व्यक्ती दुसरी कोणी नसून त्या व्यक्तीचा मेहुणा आहे. मेहुण्याने भावोजीला निर्दयीपणे मारहाण केली, ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. चार लहान मुलांनी त्यांचे वडील गमावले. मामाने असं का केलं, हाच प्रश्न त्या मुलांच्या डोळ्यात दिसत होता. तर, प्रत्येक राखीला आपल्या भावाच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करणाऱ्या बहिणीचा संसार तिच्यात भावाने उध्वस्त केला.अलवरच्या अकबरपूर पोलिस स्टेशन परिसरातील नांगली गावात ही दुःखद घटना घडली. २९ वर्षीय पवन प्रजापत हा काला कुआन येथे स्वयंपाकघरातील चिमणी बसवण्याची एजन्सी चालवत होता. काही




दिवसांपूर्वी पवनला एजन्सीमधून काही वस्तू चोरीला गेल्याचा संशय आला. त्याचा मेहुणा विष्णू, जो एजन्सीमध्ये काम करत होता, त्याच्याशी त्याचा वाद झाला. वादाचे रूपांतर शारीरिक हाणाम ारीत झाले.काही दिवसांपूर्वी पवन आणि विष्णू यांचे एजन्सीमध्ये भांडण झाले. तिथे उपस्थित असलेल्या एका कर्मचाऱ्याने त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला, पण संतापलेल्या विष्णूने त्याच्या भावोजीवर हल्ला केला. त्याने पवनला इतक्या क्रूरपणे मारहाण केली की तो रक्ताच्या थारोळ्यात पडला. संपूर्ण घटना एजन्सीम ध्ये बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. जखमी पवनला ताबडतोब रुग्णालयात नेण्यात आले, तेथून त्याला जयपूरला रेफर करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.पवन हा त्याच्या कुटुंबातील एकमेव कमावता सदस्य होता. कुटुंबात आता चार लहान मुले आहेत, त्यापैकी सर्वात धाकटी फक्त दीड महिन्याची आहे. त्याची पत्नी सतत रडते आहे. एका साध्या गोष्टीमुळे संपूर्ण कुटुंब उध्वस्त झालं. पवनचे आई-वडील वारंवार म्हणत आहेत की, 'संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी घेणारा मुलगा गेला. देव असा मेहुणा कोणालाही देऊ नये.' कुटुंबातील सदस्यांचे म्हणणे आहे की पवन एक अतिशय मेहनती आणि साधा माणूस होता. त्यांनी कधीच कल्पना केली नव्हती की विष्णू ज्याला ते कुटुंबाचा एक भाग मानत होते, तो त्यांचा आनंद हिरावून घेईल. या घटनेने संपूर्ण गाव शोकाकुल झाले आहे.

## भावानेच संसार उध्वस्त केला


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पाकिस्तानी हवाई हल्ल्यात 3 अफगाण क्रिकेटपटूंचा मृत्यू

## रशीद खानने व्यक्त केला संताप ; म्हणाला:







**नवी दिल्ली :** पाकिस्तानच्या लष्कराने पक्तिका प्रांतात केलेल्या कथित हवाई हल्ल्यात अफगाणिस्तानच्या तीन स्थानिक क्रिकेटपटूंचा मृत्यू झाल्यानंतर, अफगाणिस्तान क्रिकेट मंडळाने पाकिस्तान आणि श्रीलंकेसह होणाऱ्या आगामी तिरंगी टी-२० मालिकेतून म घार घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका पत्रकात, एसीबीने या घटनेचा निषेध केला आणि याचे ङ्कपाकिस्तानने केलेला भ्याड हल्ला असे वर्णन केले आहे.

५ ते २९ नोव्हेंबर दरम्यान लाहोर आणि रावळपिंडी येथे होणाऱ्या तिरंगी मालिकेत अफगाणिस्तान संघ सहभागी होणार होता, ज्यामध्ये पाकिस्तानसह श्रीलंकेचाही समावेश आहे.

अफगाणिस्तान क्रिकेट संघाचा कर्णधार रशीद खानने या ङ्क्रूरङ्क हवाई हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. त्याने तिरंगी मालिकेतून माघार घेण्याच्या अफगाणिस्तान क्रिकेट मंडळाच्या निर्णयाला पाठींबा दिला आहे. रशीद खान आपल्या पोस्टमध्ये म्हणाला की, ङ्कपाकिस्तानने केलेल्या हवाई हल्ल्यात अनेक नागरिकांचे मृत्यू झाल्याने मी दुःखी आहे. या हल्ल्यात महिला, मुले आणि जागतिक स्तरावर आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या इच्छुक तरुण क्रिकेटपटूंचा मृत्यू झाला आहे.

निष्पाप जीव गमावल्याच्या पार्श्वभूम ीवर, पाकिस्तानविरुद्धच्या आगामी क्रिकेट सामन्यांमधून माघार घेण्याच्या एसीबीच्या निर्णयाला माझा पाठींबा आहे. या कठीण काळात मी आमच्या नागरिकांसोबत आहे, आपली राष्ट्रीय प्रतिष्ठा महत्त्वाची आहे, असे रशीद खानने पुढे म्हटले आहे. ङ्कया हृदयद्रावक घटनेत, उरगुन जिल्ह्यातील कबीर, सिबगतुल्लाह आणि हारून या तीन क्रिकेटपटूंसह इतर ५ देशबांधव शहीद झाले असून, इतर सात जण जखमी झाले आहेतङ्क, असे एसीबीने शनिवारी एका निवेदनात म्हटले आहे. ११ ऑक्टोबर रोजी अफगाणिस्तानच्या तालिबान सैन्याने पाकिस्तानी लष्करी चौक्यांवर हल्ले केल्यानंतर दोन्ही देशांत लष्करी संघर्ष सुरू झाला आहे. दरम्यान, ४८ तासांपूर्वी अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रविराम झाला होता. पण पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या पक्तिका प्रांतात हवाई हल्ले केल्याने हा शस्त्रविराम अल्पकालीन ठरला आहे. पाकिस्तानने ड्युरंड रेषेवरील अफगाणिस्तानच्या अर्गुन आणि बर्मल जिल्ह्यांमधील निवासी भागांवर हल्ले केल्याचा आरोप आहे. तालिबानने या हल्ल्यांचा शस्त्रविरामाचे उल्लंघन म्हणून निषेध केला आहे.

# भारतीय खेळाडूने झळकावलं सर्वात वेगवान शतक!



**विशाखापट्टणम :** क्रिकेटमध्ये भारतीय खेळाडूंचा दबदबा पाहायला मिळत आहे. पुरुष आणि महिला क्रिकेटपटूंनी देखील क्रिकेटमध्ये बरीच प्रगती केली आहे. भारतीय महिला संघाकडून खेळणाऱ्या किरण नवगिरेने महिलांच्या क्रिकेटमधील एक मोठा विक्रम मोडून काढला आहे.

किरण नवगिरेने सर्वात वेगवान शतक झळकावण्याचा विक्रम मोडून काढला आहे. अवघ्या ३४ चेंडूत शतक झळकावून तिने क्रिकेट विश्वातील अनेक स्टार खेळाडूंना मागे टाकलं आहे. किरण नवगिरेची विक्रमी खेळीवरिष्ठ महिला टी -२० ट्रॉफी स्पर्धेत १७ ऑक्टोबरला झालेल्या सामन्यात महाराष्ट्र आणि पंजाब हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते.

या सामन्यात किरण नवगिरेच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मि ळाला. तिने अवघ्या ३४ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. या खेळीदरम्यान तिने ३५ चेंडूत नाबाद १०६ धावांची वादळी खेळी केली. यादरम्यान तिने ३०२.८६ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना १४ चौकार आणि ७ गगनचुंबी षटकार मारले. यासह ती महिलांच्या टी -२० क्रिकेटम ध्ये सर्वात वेगवान शतक झळकावणारी फलंदाज ठरली आहे. याआधी हा विक्रम न्यूझीलंडच्या सोफी डिवाईनच्या नावावर होता. सोफी डिवाईनने अवघ्या ३६ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं होतं. किरणला भारतीय संघाकडून ६ टी -२० आंतरराष्ट्र ीय सामने खेळण्याची संधी मिळाली आहे. या सामन्यात फलंदाजी करताना तिने पहिल्या चेंडूपासून गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. त्यामुळे विरोधी संघातील गोलंदाजांना पुनरागमन करण्याची संधीच मिळाली नाही.

या सामन्यात महाराष्ट्र संघाने एकतर्फी विजयाची नोंद केली. पंजाबने महाराष्ट्र संघासमोर विजयासाठी १११ धावांचे आव्हान ठेवले होते. हे आव्हान महाराष्ट्र संघाने ८ षटकात पूर्ण केले. किरण नवगिरेने महाराष्ट्र संघाकडून एकतर्फी खेळ केला. महाराष्ट्राकडून किरण नवगिरे आणि ईश्वरी सावकर फलंदाजीला आली. पण ती स्वस्तात माघारी परतली. त्यानंतर किरणने गोलंदाजांचा समाचार घ्यायला सुरुवात केली आणि आपल्या संघाला विजय मिळवून दिला. महाराष्ट्र संघाला विजयासाठी अवघ्या १११ धावा करायच्या होत्या. त्यापैकी १०६ धावा या किरणने केल्या होत्या.

# विराट कोहलीकडे सचिनचा सर्वात मोठा विक्रम मोडण्याची संधी




**नवी दिल्ली :** वनडे क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच असं घडणार!

भारतीय संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे आणि ५ टी -२० सामन्यांची मालिका रंगणार आहे. मालिकेतील पहिला वनडे सामना १९ ऑक्टोबरला पर्थमध्ये रंगणार आहे. हा सामना भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी अतिशय खास असणार आहे. कारण विराट कोहली आणि रोहित शर्माची जोडी ८ महिन्यानंतर क्रिकेटच्या मैदानावर पुनरागमन करताना दिसणार आहे. यादरम्यान विराट कोहलीला हा सामना आणखी खास बनवून एक मोठा विक्रम करण्याची संधी असणार आहे.

विराट कोहलीने वनडे क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं झळकावण्याच्या विक्रमात मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरची बरोबरी केली आहे. सचिनच्या नावे वनडे क्रिकेटमध्ये ५१ शतकं झळकावण्याची नोंद आहे. तर विराट कोहलीने देखील ५१ शतकं झळकावून या विक्रमाची बरोबरी केली होती. आता ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३ वनडे सामन्यांची मालिका रंगणार आहे. या ३ साम न्यांमध्ये त्याने १ शतक झळकावलं तर तो वनडे क्रिकेटमध्ये ५२ शतकं झळकावणारा जगातील पहिलाच फलंदाज ठरू शकतो.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये केवळ २ असे फलंदाज आहेत ज्यांनी वनडे क्रिकेटमध्ये फलंदाजी करताना ५० हून अधिक शतकं झळकावली आहेत. हे दोन्ही फलंदाज विराट कोहली आणि सचिन तेंडुलकर आहेत. दोघांच्या नावे ५१ शतकं झळकावण्याची नोंद आहे.

### ऑस्ट्रेलियात विराट कोहलीची कारकिर्द

ऑस्ट्रेलियात खेळताना विराट कोहलीने नेहमीच धावांचा पाऊस पाडला आहे. ऑस्ट्रेलियात खेळताना त्याला २९ वनडे सामने खेळण्याची संधी मिळाली आहे. यादरम्यान त्याने ५१.०३ च्या सरासरीने १३२७ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ५ शतकं आणि ६ अर्धशतकं झळकावली आहेत. मुख्य बाब म्हणजे विराट कोहलीने ऑस्ट्रेलियात खेळताना गेल्या पाचही डावात जबरदस्त कामगिरी केली आहे. यादरम्यान त्याने ५४,५६,८५,५४ आणि ८४ धावा केल्या आहेत. आगामी ऑस्ट्रेलिया दौरा हा विराट कोहलीच्या वनडे कारकिर्दीतील शेवटचा दौरा असू शकतो. या दौऱ्यावर तो कशी कामगिरी करणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# कॉमेडियन कपिल शर्माच्या कॅफेवर तिऱ्यांदा गोळीबार

## लॉरेन्स बिश्नोई गँगने घेतली जबाबदारी





**मुंबई :** कॅनडामध्ये लॉरेन्स बिश्नोई गँगने पुन्हा कॉमेडियन कपिल शर्माच्या कॅप्स कॅफेवर गोळीबार केला. कॅनडा सरकारने जेव्हापासून या गँगला दहशतवादी संघटना संबोधले आहे, तेव्हापासून सातत्याने या घटना होत आहेत. लॉरेन्स बिश्नोई गँगने या गोळीबाराची जबाबदारी घेतलीय. कॅनडामध्ये विविध ठिकाणी गोळीबार गँगकडून होत असून आताचा गोळीबार कॅनडा ब्रॅंपटन (ईशान्य) परिसरात झाला.

कॅनडामध्ये लॉरेन्स बिश्नोई गँगने पुन्हा एकदा कॉमेडियन कपिल शर्माच्या कॅफेवर गोळीबार केला. १६ ऑक्टोबर रोजी सकाळी कपिल शर्माच्या कॅफेवर गोळीबार झाला आणि त्याच दिवशी सायंकाळी एका बिजनेसमॅनच्या हवेलीवर देखील गोळीबार झाला. सोशल मीडियावर या गोळीबाराची जबाबदारी त्या गँगस्टर्स गोल्डी ढिल्लने घेतली आहे. कपिल शर्माच्या कॅफ वर पहिल्या हल्ल्याची जबाबदारी त्यांनीच घेतली होती. या गोळीबाराच्या घटनेचा एक व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. कॅफेवर ९-१० गोळ्या झाडण्यात आल्या. त्या कॅफेच्या भिंतीवर काचेच्या तुकडे आणि बुलेट होल्स झाले आहे.

या गोळीबारात कोणीही जखमी किंवा जीवित हानी झाली नाही. कॅनडा सरकारने जेव्हापासून लॉरेन्स बिश्नोई गँगला दहशतवादी संघटना जाहीर केले आहे, तेव्हापासून कॅनडामध्ये विविध ठिकाणी गोळीबार या गँगकडून होत आहे.

लॉरेन्स बिश्नोई गँग कडून गोळीबाराच्या या घटनेबद्दल गोल्डी ढिल्लोने सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिलं, 'सत श्री अकाल... मी गोल्डी ढिल्लो, लॉरेन्स बिश्नोई गँगमधून आहे. जमीनदार बार अँड ग्रिल (२९५ क्वीन स्ट्रीट ई, ब्रॅम्प्टन) मध्ये जे शूटिंग झाले, त्याची जबाबदारी मी घेतो. याचा आमच्या पैशांशी कोणताही वाद नव्हता. फक्त त्याला थोडी अद्दल घडवायची होती. आता तर केवळ ट्रेलर आहे, चित्रपटात जीव देखील जाऊ शकतो. जर कुणी आदर करू शकत नसेल.'

# 'कांतारा: चॅप्टर १' ने उडवला बॉक्स ऑफिसचा बार; होम्बले फिल्म्सचा विक्रम



**मुंबई :** होम्बले फिल्म्स आणि ऋषभ शेट्टीचा 'कांतारा: चॅप्टर १' ने जगभरात चित्रपटगृहात धुमाकूळ घातला आहे. २०२२ मध्ये रिलीज झालेला ब्लॉकबस्टर चित्रपट कांताराच्या या प्रीक्वलने प्रेक्षकांची मने जिंकली आहे. दमदार अभिनयाने सजलेल्या चित्रपटाची कहाणी प्रेक्षकांना खुर्चीवर खिळवून ठेवणारी आहे. मंत्रमुग्ध करणारी दृश्ये, प्रभावी डायलॉग्ज आणि सुपर डायरेक्शनने सर्वांना वेड लावलं आहे. बॉक्स ऑफिसवर कोटींचे कलेक्शन करणाऱ्या या चित्रपटाने रिलीजच्या केवळ दोन आठवड्यातच जगभरात ७१७.५० कोटींची रेकॉर्डतोड कमाई केली आहे. आता प्री-दिवाळी वीकेंडमध्ये देखील धमाकेदार कमाई करण्यासाठी हा चित्रपट तयार आहे. त्याचबरोबक दिवाळीच्या सुट्ट्यांचा भरपूर फायदा चित्रपटाला होणार आहे. निर्मात्यांनी सोशल मीडियावर लिहिलं- बॉक्स ऑफिसवर एक दिव्य तुफान KantaraChapter1 जगभरात ७१७.५० कोटींचे ऋजउ पार केले आहे. या दिवाळीत BlockbusterKantara सोबत उत्सव साजरा करा...' चित्रपटात ऋषभ शेट्टी, सप्तमी गौडा, गुलशन देवैया, रुक्मिणी वसंत, जयराम, पीडी सतीश चंद्र, प्रकाश थुमिनाड आणि अन्य प्रतिभाशाली कलाकारांच्या भूमिका आहेत. चित्रपटाची कथा, दिग्दर्शन आणि मुख्य भूमिका ऋषभ शेट्टीची आहे. हा चित्रपट विजय किरागंदूर द्वारा होम्बले फिल्म्सच्या बॅनर अंतर्गत निर्मित आहे. सिनेमॅटोग्राफी अरविंद एस. कश्यपने केली आहे.

# बॉलीवूड सोडणाऱ्या अभिनेत्री झायरा वसीमने केलं लग्न!




**मुंबई :** इस्लाम धर्मासाठी बॉलीवूड सोडणारी अभिनेत्री झायरा वसीम हिने लग्न केलं आहे. 'दंगल' फेम झायला वसीमने इन्स्टाग्रामवर दोन फोटो शेअर करून लग्न केल्याची माहिती चाहत्यांबरोबर शेअर केली. झायराची ही पोस्ट चांगलीच व्हायरल झाली असून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होतोय.



झायराने इन्स्टाग्रामवर दोन फोटो पोस्ट केले आहेत. एका फोटोत ती निकाहनाम्यावर सही करतेय. तर दुसरा फोटो तिच्या पतीबरोबरचा आहे. या फोटोत ती व तिचा पती चंद्राकडे बघत आहेत. हा त्यांचा पाठमोरा फोटो आहे. झायरा व तिचा पती दोघांचाही चेहरा यात दिसत नाही. झायरा वसीमने हे फोटो शेअर करताना छोटसं कॅप्शन दिलं आहे. कॅप्शनमध्ये तिने मोजकेच शब्द लिहिले आहे. Qubool hai x3 असं लिहून झायरा वसीम ने ही पोस्ट केली आहे. तिच्या पोस्टवर चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. आयुष्यातील नवीन प्रवासासाठी तिला चाहते शुभेच्छा देत आहेत.

## झुबीन गर्ग मृत्यूप्रकरणात त्यांच्या बॅंडमधील दोन सदस्यांना कोठडी



**मुंबई :** गायक झुबीन गर्ग यांचे सप्टेंबर महिन्यात सिंगापूरमध्ये निधन झाले. झुबीन यांच्या मृत्यूप्रकरणी १४ दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर, झुबीन गर्गच्या दोन बॅंड सदस्य शेखर ज्योती गोस्वामी आणि अमृतप्रवा महंता यांना शुक्रवारी न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले.

कामरूप येथील मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी या दोघांना न्यायालयीन कोठडी सुनावली. दोघांना आधी न्यायालयात आणण्यात आलं आणि नंतर वेगवेगळ्या पोलीस व्हॅनमधून नेण्यात आले. त्यांना १४ दिवसांनी पुन्हा न्यायालयात हजर केलं जाईल. झुबीन गर्ग यांच्या मृत्यूप्रकरणातील इतर पाच आरोपींना बुधवारी न्यायालयीन कोठडीत पाठवल्यानंतर बक्सा जिल्हा कारागृहाबाहेर हिंसाचार झाला. त्यामुळे या दोघांना कोणत्या तुरुंगात ठेवलं जाईल याबद्दल अधिकाऱ्यांनी कोणतीच माहिती दिलेली नाही. एसआयटीने बऱ्याच दिवसांच्या चौकशीनंतर गोस्वामी व महंता दोघांनाही ३ ऑक्टोबर रोजी अटक केली होती. त्यानंतर त्यांना १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. दरम्यान, आसाम सरकारने सिंगापूरमध्ये झुबीन गर्ग यांच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी १० सदस्यांची एसआयटी स्थापन केली होती. आतापर्यंत राज्यभरातून महंता, शर्मा व इतरांविरोधात ६० हून जास्त एफआयआर दाखल करण्यात आल्या आहेत. यानंतर मुख्यमंत्र्यांनी डीजीपींना या सर्व तक्रारी सीआयडीकडे सोपवण्याचे व सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले.

# अभिनेता खेसारी लाल यादव उतरणार बिहार निवडणुकीच्या रिंगणात..!



**पटणा :** भोजपुरी अभिनेता खेसारी लाल यादव बिहार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरत आहे. ते छपरातून आरजेडीसाठी निवडणूक लढतील. ते आज अर्ज दाखल करणार असून सोशल मीडियाच्या माध्यमातून फॅन्सना माहिती दिलीय. भोजपुरी सुपरस्टार खेसारी लाल यादव चित्रपटानंतर आता राजकारणात आपले नशीब आजमावणार आहेत. त्यांनी फॅन्सकडे प्रार्थना करण्याचे आवाहन केले आहे.

खेसारी लाल यादवने गुरुवारी रात्री जाहीर केले होते की, ते निवडणूक सत्तेसाठी लढणार नाही तर ते जनतेचे पुत्र आहेत आणि राजकारणाला आपली जबाबदारी मानतात. खेसारी आता रिंगणात उतरणार म्हटल्यावर सगळीकडे चर्चेचा विषय सुरु आहे. आधी पवन सिंह निवडणूक लढण्यासाठी समोर आले होते. परंतु, खासगी कारणामुळे ते निवडणुकीच्या मैदानात उतरले नाहीत.

खेसारी म्हणाले, 'मी माझा अर्ज दाखल करत आहे आणि या औचित्याने तुमचा सर्वांचा आशीर्वाद, पाठिंबा माझ्यासाठी मोठे आहे. मनापासून आपल्या सर्वांना विनंती आहे की, नामांकना दिवशी या, तुमच्या मुलाला आणि भावाला आशीर्वाद द्या. आम्ही तुमचा हक्क आणि सम्मानाची लढाई आणखी दृढपणे लढू शकू.' भोजपुरी इंडस्ट्रीत खेसारी लाल यादव यांचे फॅन फॉलोईंग खूप अधिक आहेत. सोशल मीडियावर ६.५ मिलियनच्या जवळपास फॉलोअर्स आहेत. त्यांचा अभिनय आणि गाण्याचे लोक वेडे आहेत. खेसारी जेव्हा मैदानात उतरतील, तेव्हा राजकीय वर्तुळात खूप चर्चा रंगणार आहे. याआधी मनोज तिवारी, रवि किशन यासारखे स्टार्सनी राजकारणात आपले नशीब आजमावले आहे. ज्यामध्ये त्यांना यशही मिळाले आहे. आता खेसारी लाल यादव यांचे नशीब किती चमकते, हे पाहणं रंजक ठरेल.

# वसुबारस निमित्त बुलढाणा तालुका कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा संपन्न!

**जनसंचलन/बुलढाणा**

दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ रोजी सागवन येथे महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग खाद्यतेल अभियान अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी परिसरातील शेतकरी बांधवांसोबत उपस्थित राहून शेतीतील आगामी हंगामातील येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना समजून घेतल्या. या कार्यक्रमाला कृषी विज्ञान केंद्र बुलढाणा येथील देशपांडे साहेब यांनी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी येणाऱ्या रब्बी हंगामातील पिकांसाठी सर्व शेतकरी बांधवांना हुमणी अळी चे योग्य नियोजन करण्यासंदर्भात कुठलीही अडचण असेल तर कृषी विज्ञान केंद्र बुलढाणा येथे येऊन आपली समस्या सांगून योग्य सल्ला घ्या परंतु हुमणी अळीसाठी गाफील राहू नका, यंदा पाऊस उन्हाळ्यातही पडल्यामुळे हुमणी अळीचा प्रादुर्भाव वाढणार आहे तरी शेतकऱ्यांनी आपल्या आगामी हंगामातील रब्बी पिकांचे होणारे नुकसान टाळले पाहिजे असा मोलाचा सल्ला दिला. शेतकऱ्यांनी बीबीएफ पद्धतीने पेरणी केल्यास फायदा होईल, फवारणी करतांना आता बाजारात फवारणी किट उपलब्ध आहे त्याचा वापर करावा, गव्हाला २१ व्या दिवशी पाणी दिल्यामुळे उत्पन्न वाढते, हरबरा पिकात मिश्र पीक म्हणून कोथिंबीर, चवळी, झेंडू लागवड केल्यामुळे नैसर्गिक किड नियंत्रण शक्य होईल, तूर पिकातील पिसारी पतंग, शेंग माशी, तसेच हरबरा पिकातील मर रोग, बुरशीजन्य आजार यावर सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाच्या उद्घाटन कार्यक्रमाला भाजपा तालुका अध्यक्ष सतीश भाकरे पाटील, प्रगतशील शेतकरी प्रल्हाद धांडे, मंडळ कृषी अधिकारी गवई साहेब, उपकृषी अधिकारी म्हस्के साहेब, अंकुश जाधव साहेब, अंभोरे साहेब, सहाय्यक कृषी अधिकारी बोर्डे मॅडम, नेमाने मॅडम, लहाने मॅडम, शेळके मॅडम, जाधव मॅडम, पवार साहेब, प्रगतशील शेतकरी



सर्वश्री प्रभाकर खांडवे, प्रकाश भाकरे, रुस्तुम सोनुने, मुकेश शिरसाट, श्रीकृष्णा राजपूत, प्रवीण राजपूत, अशोक शिंदे, शिवशंकर जतकर, रवी पाटील, निंबाजी शिंदे, राजू सोनुने, दिलीप राजपूत यांच्यासह अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते. कृषी सहाय्यक देशमाने मॅडम यांनी कार्यक्रमाचे आयोजन करून उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# संघ शाखेत शारिरिक मानसिक बौध्दीक शक्ती वाढते - जिल्हा प्रचारक समीर देशमुख




**जनसंचलन/बुलढाणा**

राष्ट्रीय स्वंसेवक संघाच्या शाखेतून बाल मनावर राष्ट्र विचाराचे संस्कारासोबत शारिरिक, मानसिक बौध्दिक शक्ती वाढते. स्वातंत्र्याच्या चळवळीत देशभक्तीचे संघटन करण्यासोबत शिस्तबद्ध संस्कारक्षम नागरिक खेळाच्या माध्यमातून चांगले तरूण घडविण्यासाठी भारतमातेला परम वैभव प्राप्त करून देण्यासाठी पू. डॉ. हेडगेवार यांनी संघाची शाखा सुरु केली. त्यातूनच नविन पिढी घडविण्याचे कार्य सतत सुरु आहे. प्रत्येकाने शाखेत यावे असे आवाहन संघाचे जिल्हा प्रचारक समीर देशमुख यांनी केले. विजयादशमी निमित्त रा. स्व. संघ बाल व शिशू स्वयंसेवकांचे पथसंचलन व उत्सवाचे आयोजन फुलबाग बालकमंदीर केशव नगर येथे दि. १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता करण्यात आले होते. पथसंचलन घोषपथकासह काढण्यात आले. मार्गावर रांगोळी काढून पुष्प वर्षाव करीत स्वागत करण्यात आले. उत्सवाच्या व्यासपीठावर विभाग संघचालक चित्तरंजन राठी, प्रमुख पाहुणे फायनांशियल व पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट ट्रेनर तुषार डोडिया, प्रमुख वक्ते जिल्हा प्रचारक समिर देशमुख, नगर सहकार्यवाह विवेक उबरहंडे होते. प्रमुख वक्ते समीर देशमुख यांनी भारत मातेला विश्वगुरु बनविण्यासाठी समर्पित ध्येयाने संस्कार देण्याचे कार्य शाखेतून मी शिवाजी खेळाच्या माध्यमातून शिकविल्या जाते. त्याचे सर्व गुण बालमनावर निर्माण केल्या जातात. आजकाल मोबाईल वर गेम्स खेळल्यामुळे बालमनावर परिणाम होतो. चार भिंतीच्या आतील खेळांपेक्षा त्याउलट शाखेतून मैदानी खेळ आत्मविश्वास वाढवितात. देशभक्तीचा भाव गितांच्या माध्यमातून निर्माण होतो. सुभाषित, गीत, अमृतवचनच्या वाचनातून चांगले नागरिक घडविण्याचे संघस्थावर कच्चा मातीला पक्के बनविण्याचे काम करण्यास येते. संघाच्या एक तासाच्या शाखेत एकत्र आले पाहिजे असे त्यांनी आवर्जून सांगितले. प्रमुख अतिथी तुषार डिडोया यांनी संघाच्या शाखेत बालमनावर राष्ट्र भक्तीचे संस्कारासोबत जीवन मुल्यांचे शिक्षण दिल्या जाते त्याचा अभिमान वाटतो लहान बालस्वयंसेवक शिस्तीने पथसंचलन योग प्रात्याक्षिक करतात हे पाहून त्यांने कौतुक वाटते असे त्यांनी आवर्जून सांगितले. प्रारंभी भारतमाता व शस्त्रपूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. नियुद्ध प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सुभाषित विराट तयाडे, अमृतवचन आनंद क्षीरसागर, वैयक्तीक गीत सुधनवा चाटोरीकर यांनी तर प्रास्ताविक परिचय नगर सहकार्यवाह विवेक उबरहंडे यांनी केले. उत्सवाला विविध क्षेत्रातील मान्यवर नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते

# बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजची कु. पुनम बंगाळे सुवर्ण पदकाची मानकरी




**जनसंचलन/बुलडाणा**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे नुकत्याच झालेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजची विद्यार्थीनी कु. पुनम बंगाळे हिने १०० व २०० मीटर शर्यतीत प्रथम क्रमांक प्राप्त करुन दोन सुवर्ण पदके मिळविली. कु. पुनम हिने क्रीडा क्षेत्रात महाविद्यालयासह बुलडाणा शहराचा गौरव वाढविला आहे. कु.पुनम बंगाळे ही बी.एस्सी. भाग-१ ची विद्यार्थीनी असून अतिशय अटीतटीच्या झालेल्या स्पर्धेत तिने १०० मी व २०० मीटरची शर्यत पूर्ण करुन आपला वेग आणि कौशल्य सिध्द केले. स्पर्धेत अनेक स्पर्धक आणि विद्यापीठांच्या खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या दुहेरी विजयामुळे मॉडेल डिग्री कॉलेजचे नाव संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठस्तरावर चमकले आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे यांनी कु. पुनमचे विशेष अभिनंदन केले. तिचा हा विजय केवळ महाविद्यालयासाठी नव्हे, तर सर्व महिला खेळाडूंसाठी एक प्रेरणास्त्रोत आहे. तिच्या मेहनत आणि सातत्याचे हे यश असल्याचेही ते म्हणाले. हा विजय प्रशिक्षकांना आणि महाविद्यालयाला समर्पित आहे. तिला प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचा पाठिंबा लाभला. आता राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करण्याचे ध्येय असल्याचे पुनम यावेळी म्हणाली. ती विद्यापीठाचे बेंगलोर येथे होणा-या स्पर्धेत प्रतिनिधित्व करणार आहे. महाविद्यालयाच्या क्रीडा विभागप्रमुख प्रा.सुनिता गायकी, डॉ.महेश व्यवहारे, क्रीडा समिती सदस्य प्रा.किशोर बुलकडे, प्रा.तुषार पारवे यांनी कु. पुनमला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बॅग लिफ्टींग करणारे मध्यप्रदेशातील २ आरोपी चिखली डि बी पथकाच्या जाळ्यात!

**जनसंचलन/ चिखली**

बॅग लिफ्टींग करणारे मध्यप्रदेशातील २ आरोपी चिखली डि बी पथकाच्या जाळ्यात अडकले आहेत.हिंमाशु कुमेरसिंग छायल वय २४ वर्ष, रीहान सिंकदर सिसोदिया वय १९ वर्षे दोन्ही राहणार कडीया पो.स्टे. पिपडीया, जिल्हा राजगड राज्य मध्य प्रदेश असे आरोपींचे नाव आहे. याबाबत हकीकत अशी की, १५ ऑक्टोंबर रोजी फीर्यादी मयुर प्रभुलाल पाराशर, रा. संभाजी नगर चिखली यांनी पोलीस स्टेशनला येवुन रिपोर्ट दिला की, ते दिनांक १५ ऑक्टोंबर २०२५ रोजी दुपारी अंदाजे १.३० वाजता सुमारास त्यांना दिवाळी निमीत्त सामान खरेदी करण्यासाठी त्यांची स्पेल्डर प्रो मोटारसायकल क्रमांक एम एच २८ ए. एम ६२३१ च्या डीक्की मध्ये १०००० रुपयांची कापडी पिशवी ठेवली. त्यांनतर फिर्यादी व त्याचा मित्र हे मोटारसायकल राधा टी सेंटर समोर उभी करून तळघरात हॉटेल मध्ये चाहा घेवुन परत आले असता फिर्यादीचे मोटारसायकल जवळ अंदाजे १९ ते २१ वयोगटातील निळ्या रंगाची हाप टी शर्ट घातलेल्या वर्णनाचा इसम हा मोटारसायकलच्या डीक्की मधुन १०,००० रूपये ठेवलेली पिशवी काढुन रोड वर काही अंतरावर उभे असलेल्या काळया रंगाची लाल पटटा असलेली विना क्रंमाकाची मोटार सायकलवर बसुन मोटारसायकल चालक इसमा सोबत सिध्द सायन्स चौका कडे जाताना दिसुन आले. त्यावेळी फिर्यादीने त्याच्या मित्रासह मोटारसायकलची डीक्की उघडुन पाहणी केली असता डिक्की मधील १०,००० रूपये ठेवलेली कापडाची पिशवी दिसुन आली नाही. त्यांनतर लगेच पैसे चोरी करणाऱ्या इसमाचा पाठलाग करत जात असताना सिध्द सायन्स चौक येथे पोलीसांना घटनेची माहिती देवून पोलीसांसह चोरी करणाऱ्या इसमाचा शोध घेतला असता दोन इसम हे मोटारसायकलवर फौजी हॉटेलच्या पुढे काही अंतरावर दिसुन आले. त्यावेळी पोहेकॉ गजानन काकडे व पोना अमोल गवई यांनी पकडुन त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव हिंमाशु कुमेरसिंग छायल वय २४ वर्ष, रीहान सिंकदर सिसोदिया वय १९ वर्षे दोन्ही राहणार कडीया पो.स्टे. पिपडीया, जिल्हा राजगड राज्य मध्य प्रदेश असे सांगितले. यावरुन सदर इसमाना विचारपुस केली असता ते उडवा उडवीचे उत्तर देत असल्याने त्यांना चौकशीकामी ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले. फिर्यादीने घटनेची तक्रार दिल्यावरुन पोलीस स्टेशन चिखली अप क्रं ८०९/२५ कलम ३०३(२), ३(५) भा.न्याय संहीता प्रमाणे गुन्हा दाखल करुन तपास डि बी पथकाचे सफौ राजेंद्र काळे याचेकडे देण्यात आला. सदर गुन्हयाचे अनुषगांने ठाणेदार पो. नि. संग्राम पाटील यांनी डि.बी. पथक यांना गुन्हयासंदभांने सखोल तपास करण्याचे सुचना दिल्या सदर गुन्हयाचा कसुन तपास केला असता आरोपी अशा प्रकाचे गुन्हे करण्याचे सवयीचे असुन त्यानी गुन्हयाची कबुली दिल्याने आरोपी यांना गुन्हयात अटक करुन गुन्हयात चोरी गेलेला मुद्देमाल १०००० रुपये तसेच गुन्हयात वापरलेली मोसा एस पी होंडा कि. ९०००० असा एकुण १००००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक निलेश तांबे साहेब बुलडाणा, अपर पोलीस अधिक्षक अमोल गायकवाड साहेब बुलडाणा, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील बुलडाणा यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. संग्राम पाटील, डि.बी. पथकाचे परीपोउपनि समाधान वडणे, सफौ राजेंद्र काळे, पोना अमोल गवई व, पोकॉ. प्रशांत धंदर, पोका अजय इटावा, पंढरीनाथ मिसाळ, राहुल पायघन, विशाल वायाळ, गजानन काकडे यांनी केली आहे.




# रब्बी हंगामात प्रमाणित बियाणे वितरणास सुरुवात; शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन



**जनसंचलन/बुलढाणा**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानांतर्गत सन २०२५-२६ मध्ये रब्बी हंगामासाठी अन्नधान्य, कडधान्य व पौष्टीक तृणधान्य पिकांच्या प्रमाणित बियाणे वितरणाचे नियोजन करण्यात आले आहे. शेतकरी बांधवांनी आपल्या सहाय्यक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधून वेळेत अनुदानित बियाण्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि कार्यालयाचे तंत्र अधिकारी अजय वाढे यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत हरभरा आणि ज्वारी पिकांसाठी बियाणे अनुदान दर निश्चित करण्यात आले आहेत. हरभरा १० वर्षांआतील वाणाकरिता २०७३.४ क्विंटल बियाण्यांचे वितरण ५० रुपये प्रति किलो अनुदान दराने करण्यात येणार आहे. तर १० वर्षांवरील वाणाकरिता २५ रुपये प्रति किलो अनुदान असेल. तसेच ज्वारी १० वर्षांआतील वाणाकरिता ४० क्विंटल बियाणे ३० रुपये प्रति किलो अनुदान दराने, आणि १० वर्षांवरील वाणाकरिता १७० क्विंटल बियाणे १५ रुपये प्रति किलो अनुदान दराने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बियाणे वितरण ङ्ग्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्यफ () या तत्वावर करण्यात येईल. यासाठी महाबीज, राष्ट्रीय बीज निगम व कृभको या संस्थांच्या अधिकृत वितरकांमार्फत शेतकऱ्यांना अनुदानित बियाणे मिळणार आहेत. शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी, सातबारा उतारा व आधार कार्ड असणे आवश्यक असून, एका शेतकऱ्याला केवळ १ हेक्टर मर्यादेत प्रमाणित बियाण्याचा लाभ देण्यात येईल.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४–२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००–३१३–२३२४